DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41, व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 04.04.2020.

5. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(A) दि. 03.04.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 12 /04/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी लॉकडाऊनचे आदेश पारित केले आहेत.

ज्याअर्थी बियाणे व खते या कृषि निविष्ठांचा जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अंतर्गत समावेश आहे आणि ज्याअर्थी बियाणे व खते या कृषि निविष्ठांचा वापर कृषी मालाच्या उत्पादनासाठी अत्यावश्यक असल्याने बियाणे व खते या कृषि निविष्ठांची विक्री करणारी दुकाने/आस्थापना, बिज प्रक्रिया केंद्र, त्यानुषंगीक बियाणे पॅकींग, हातळणी केंद्र, बीज परिक्षण प्रयोगशाळा, कृषी यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग (त्याच्या पुरवठा साखळीसह) व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने लॉकडाऊनचे कालावधीत सुरु ठेवणे गरजेचे आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार जीवनावश्यक वस्तु अधिनियम 1955 चे कलम 3(2) (ड) अन्वये तसेच उपरोक्त नमूद वाचा क्र. 5 मधील सूचनांचे अनुषंगाने **उस्मानाबाद जिल्हयातील बी बियाणे व खते या कृषि निविष्ठांची विक्री करणारी दुकाने/आस्थापना, बिज प्रक्रिया केंद्र, त्यानुषंगीक बियाणे पॅकींग, हातळणी केंद्र, बीज परिक्षण प्रयोगशाळा कृषी यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग (त्याच्या पुरवठा साखळीसह) व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने लॉकडाऊनचे कालावधीत सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत चालु ठेवण्यासाठी परवानगी देत आहे.**



Scanned by CamScanner

लॉकडाऊनचे काळामध्ये वरिल नमूद वेळेत बाहेर पडता यावे याकरिता तालुक्यातील बी बियाणे व खतांचे विक्रेते, बिज प्रक्रिया केंद्र, त्यानुषंगीक बियाणे पॅकींग, हातळणी केंद्र, बीज परिक्षण प्रयोगशाळा, कृषी यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग (त्याच्या पुरवठा साखळीसह) व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने येथील कर्मचारी यांची यादी तालुका कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती यांनी संबंधित पोलीस स्टेशन व तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER यांचे कार्यालयास सादर करावी.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद.
4. जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, उस्मानाबाद.
5. जिल्हा बिज प्रमाणीकरण अधिकारी, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
10. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
11. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

17/4/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner